# कुंती

अनंत तिबिले

**रिया पब्लिकेशन्स्, कोल्हापूर**

प्रमुख वितरक

**अजब डिस्ट्रिब्युटर्स**

६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.

**कुंती : अनंत तिबिले**

© **शितल मेहता**
कोल्हापूर.

**प्रकाशक**
रिया पब्लिकेशन्स्
२५०, ब-३०, शितल बंगला,
नागाळा पार्क, कोल्हापूर.

**प्रमुख वितरक**
अजब डिस्ट्रिब्युटर्स
६७८-ई, निदान हॉस्पिटलसमोर,
शाहूपुरी, २ री गल्ली, कोल्हापूर.
मोबा. : ९४२२४२१५०२

**अक्षरजुळणी**
रविंद्र सावंत

**मुखपृष्ठ**
चित्रमित्र पब्लिसिटी, कोल्हापूर.

**मुद्रक**
श्री ज्योतिर्लिंग ऑफसेट, कोल्हापूर.

**आवृत्ती**
नोव्हेंबर, २०१२

**किंमत**
रुपये ३००/-

# कुंती

# एक

ती महालामागच्या उपवनात विहार करीत होती. हा तिचा नेहमीचा कार्यक्रम होता. उपवनात विहार करताना ती काही एकटी असायची नाही. तिच्याबरोबर काही सामंतांच्या मुली आणि दासीही असायच्या. हे उपवन तातांनी केवळ तिच्यासाठीच बनवलं होतं. कुणा दुसऱ्या पुरुषाला इथं येण्यास परवानगी नव्हती. त्यामुळे त्या सगळ्याजणी उपवनात मुक्तपणाने संचार करीत असत.

हे उपवन तातांनी खास आपल्या नजरेखाली बनवून घेतलं होतं. उपवनात नानाविध वृक्ष होते, तसेच निरनिराळा सुमधुर सुगंध देणारी फुलांची रोपटीही होती आणि ती एवढ्या आकर्षक पद्धतीनं बनवली होती की कोणालाही सुमधुर सुगंध देणाऱ्या त्या उपवनात विहार करण्याची इच्छा व्हावी. जागोजागी तातांनी पुष्करणीचीही व्यवस्था केलेली होती. त्यातून कारंजी सतत उडत असत. त्यांचे धवल थेंब अंगावर पडताच अंगभर गोड शिरशिरी उठत असे. सकाळची वेळ. पूर्वेच्या अंकावरून जागृत झालेला सूर्य आपल्या नित्यकर्मासाठी वर डोकावू लागला होता. त्याची किरणे आसमंतात भरून राहिलेली होती. रविकरस्पर्शाने पुलकित झालेल्या कळ्या हळूहळू आपल्या पाकळ्या उघडू लागल्या होत्या. उपवनात नानाविध पक्ष्यांचे थवेच्या थवे नित्यनियमाने वस्तीला असत. तेही जागृत होऊन गोडसा किलबिलाट करू लागले होते. उपवनात हरीण, ससे, मयुरादी प्राणीही वास्तव्यास होते. त्यांचं उपवनातलं विहार करणं मन मोहित करून टाकणारं होतं. हे सगळं सौंदर्य अधीरपणाने डोळ्यात साठवत तिच्या सख्या उगाचच इकडून तिकडे फुलपाखरासारख्या भ्रमण करीत होत्या.

अखेर काहीसं थकल्यासारखं वाटल्यामुळे ती स्वत: पुष्करणीवर टेकली. तिच्यासमोरच सामंतकन्या खालच्या हिरवळीवर बसल्या. त्यांच्यामागे दासी उभ्या होत्या.

तिचं लक्ष मयुरीकडे गेलं. मयुरी एक सामंतकन्या. खूप देखणी, पण नाजूक अगदी लतिकेसारखी. नुकताच तिचा विवाह संपन्न झाला होता. मयुरी तिची प्रिय सखी असल्याकारणाने ती या विवाहाला गेली होती. पण विवाह मंडपातल्या गर्दीमुळे मयुरीच्या पतीला तिला पाहता आले नव्हते. मयुरी काही दिवस श्वशुरगृही राहून माहेरी परतली होती. तिची थोडीशी थट्टा करण्याच्या इराद्याने तिने तिला हाक मारली, ''मयुरीऽऽ''

''जी राजकुमारी?''

''तिकडून केव्हा आलीस?''

तिने तिकडून या शब्दावर थोडासा अधिक जोर दिला होता आणि तो मयुरीच्या ध्यानात आला होता. ती काहीशी लाजली. तिचे मूळचेच गोरे गाल अधिकच आरक्त बनले. नजर तिला नकळत झुकली. ती ओठातल्या ओठात पुटपुटली, ''काल रात्री.''

''येताना श्वशुरगृहातून पाय निघाला ना? नाही म्हणजे श्वशुरगृही गेलेल्या मुली माहेरी यायला सहजासहजी तयार होत नाहीत म्हणून विचारलं?''

''माझ्या बाबतीत तसं मुळीच झालं नाही? केव्हा एकदा घरी येईन आणि मातेच्या मिठीत शिरेन असं होऊन गेलं होतं मला.''

''याचा अर्थ काय समजायचा गं आम्ही? तुमच्या ह्यांनी तुम्हाला फार त्रास तर दिला नाही ना?''

मयुरी अधिकच लाजली आणि लटक्या रागाने म्हणाली, ''राजकुमारीजी, थट्टा पुरी करा ना?''

''मयुरी, आम्ही थट्टा करीत नाही. सत्य जाणून घेण्याचा प्रयत्न करीत आहोत. नाहीतरी कधी ना कधीतरी आम्हालाही असंच श्वशुरगृही जावंच लागणार आहे. तेव्हा तुझा अनुभव ऐकून आम्हालाही आमच्या मनाची तयारी करायला नको का?''

''मयुरी-'' लुब्धाने विचारले. लुब्धाही सामंतकन्याच.

मयुरीने तिच्याकडे पाहिले.



''तुझे ते कसे आहेत गं?''

मयुरी काहीच बोलली नाही. मात्र मान खाली घालून तशीच बसून राहिली. तीच म्हणाली, ''मयुरी, अगं सांग ना गं! ते तुला शोभणारे आहेत ना?''

''मी त्यांना अजून पाहिलेलंच नाही.'' मयुरी पुटपुटली.

''आश्चर्य आहे. इतके दिवस श्वशुरगृहात राहून तू तुझ्या ह्यांना पाहिलं नाहीस, यावर कुणी विश्वास ठेवेल का?''

''मी खरंच त्यांना पाहिलेलं नाही.''

''अगं पण का?''

''श्वशुरगृही नातेवाइकांची एवढी गर्दी होती की, आम्ही एकमेकांना भेटूही शकलो नाही. मी तर सतत नातेवाईक स्त्रियांच्या घोळक्यात असायची.''

''आणि तुझे ते?''

''त्यांचं मला ठाऊक नाही.''

''त्यांनी तुला भेटण्याचा प्रयत्न केला नाही?''

''एकदा केला.''

''तो कसा गं?''

''त्यांनी सकाळी सकाळी एका दासीला पाठवलं आणि मग मला उपवनात येण्याची अनुज्ञा केली.''

''मग ही चांगली संधी होती की.''

''मी ठरवल्याप्रमाणे सगळ्यांच्या नजरा चुकवून उपवनात चालले होते आणि त्याचवेळी काही स्त्रियांनी माझा रस्ता अडवला होता. कसं कोण जाणे, पण मी यांना भेटायला चालले आहे हे त्यांना समजले होते.

त्यातील एकजण मला म्हणालीही, 'मयुरी, यापुढचं सगळं आयुष्य तुला त्यांच्याबरोबर काढायचं आहे, मग आत्ताच एवढी घाई का? आम्ही तर पाहुण्या; चार दिवस राहणार आणि आपापल्या घरी निघून जाणार. पुन्हा आपली भेट होईल की नाही याची शंका.'

''मयुरी, तू वेडीच आहेस बघ. तू त्यांना बाजूला करून तडक तुझ्या यांच्याकडे जायला हवी होतीस. त्यामुळे यांचं दर्शन घडलं असतं. चार-दोन गोष्टी बोलता आल्या असत्या आणि...''

''आणि काय हो राजकुमारीजी?''

''आपल्याला हवंहवंसं वाटणारं काहीतरी मिळवताही आलं असतं.''

मयुरी खूपच लाजली. लटक्या रागाने उठलीही आणि म्हणाली, ''मी जातेच कशी.''

पण तिने तिला थांबवले आणि सगळ्यांना बजावले, ''ए, आता कुणीही मयुरीची थट्टा करायची नाही हं! कारण आज ना उद्या आपल्या प्रत्येकीच्या आयुष्यात हा असा प्रसंग येणारच आहे. पण बाई, आम्हाला एका गोष्टीचा राग येतो.''

''तो कोणत्या राजकुमारीजी?''

''या मोठ्या माणसांच्या वर्तणुकीचा. खरं तर विवाह हा संस्कार दोन जिवांना एकत्र आणण्याचा संस्कार. एवढ्याचसाठी हा विवाह करतात ना? मग दोन जीव एकत्र होण्यासाठी चालले असताना या वडीलधाऱ्यांनी आडकाठी कशासाठी करायची? सख्यांनो, आता आपण काही लहान नाही. आपल्याला चांगलं समजतं, उमजतं. आपल्यापैकी प्रत्येकजण स्वप्न पाहतो आणि आमची खात्री आहे, आपल्यापैकी प्रत्येकीचं स्वप्न एकच आहे. आपला विवाह व्हावा. आपल्याला अनुरूप वर मिळावा आणि त्यांच्या सहवासात आपण आपलं उर्वरित आयुष्य सुखासमाधानात काढावं. हे असं स्वप्न पाहणं अनुचित आहे का? पण हे वडीलधाऱ्यांना कळतच नाही. खरंतर ही वडीलधारी माणसंही यातून गेलेली असतात. आपलं बरंचसं आयुष्य आपल्याला लाभलेल्या साथी-सांगातीसमवेत त्यांनी व्यतीत केलेलं असतं आणि तरीही ही माणसं आपली वाट अडवतात. आपल्याला आपल्या मनासारखं वागू देत नाहीत. त्यांचं हे वागणं बरोबर आहे का?''

यावर कुणीही काही बोललं नाही.

उन्हं वाढली होती. अंगाला चटके बसत होते. तिने तो विषय तिथंच बंद केला आणि म्हणाली, ''चल आपण निघूया. बराच वेळ झालाय. प्रत्येकीच्या घरी आपली वाट पाहात असतील.''

आणि ती चालू लागली. तिच्याबरोबर सामंतांच्या मुली आणि दासींनीही तिचं अनुकरण केलं.

तिने महालात प्रवेश करण्याच्या आधी तिच्या सख्या तिचा निरोप घेऊन निघून गेल्या. जाता जाता तिने मयुरीला जवळ बोलावले आणि तिलाच ऐकू जाईल इतक्या हळू आवाजात म्हणाली, ''मयुरीऽऽ''

''जी?''



''तिकडे कधी जाणार?''

''ते का माझ्या हाती आहे!''

''तोवर इथं करमेल ना?''

ती गप्पच बसली.

तीच म्हणाली, ''निदान त्याला पाहिले असतेस तर त्याचं रूप न्याहाळण्यात रात्र गेली असती; पण दुर्दैवाने तेही जमले नाही तुला. मला तुझी खरंच दया येते. मयुरी, आपण मुली अविवाहित असतो ना, त्यावेळी त्याचं एक काल्पनिक रूप डोळ्यासमोर ठेवून स्वप्नांचे मनोरे उभे करीत असतो. पण एकदा तिचा विवाह झाला की, मग तिला अन्य कुणाचं रूप समोर उभं करण्याचा अधिकार असत नाही. कारण ते पाप ठरते.''

महालाकडे जात असताना तिच्या डोक्यात विचार घोळत होते. तिच्या मागून तिच्या दासीही येत होत्या. पण तिच्या मनात उठलेल्या विचारांचे वादळ त्यांना कळणे अशक्यच होते.

तसं तिचं बालपण त्यांच्यातच गेलेलं होतं. अगदी चालायला शिकल्यापासून त्या सतत तिच्या अवतीभोवती घोटाळत असायच्या. तिची काळजी घ्यायच्या. काय हवं नको ते तत्काळ आणून द्यायच्या. काहीही झालं तरी तिला रडू द्यायच्या नाहीत. त्यामुळे त्यांच्या समवेतच ती मोठी झाली. आज तर अगदी यौवनात पदार्पण केले होते तिने.

त्यांच्यात नि तिच्यात तसा खूपच फरक. ती राजकन्या महाराज शूरांची एकमेव लाडकी कन्या. त्यामुळे दासी म्हणून अवतीभोवती फिरणाऱ्या त्या तिच्याशी काही अंतर ठेवूनच वागायच्या. त्यांच्यात वावरत असताना आपण राजकन्या आहोत असं तिला कधीही जाणवायचं नाही. कारण तिचा स्वभावच मुळी मनमोकळा आणि सगळ्यांच्यात मिळून मिसळून वागणारा त्यामुळे ती नेहमी त्यांच्याशी सलगी करण्याचा प्रयत्न करायची. पण त्यांना ते कसंसंच वाटायचं. कारण तिच्यातला आणि आपल्यातला फरक त्या चांगला जाणून असायच्या.

तिचं बालपण तसं खरंच सुखात गेलं. तिला कधीही कोणत्याही गोष्टीची उणीव भासली नाही. चांगलेचुंगले कपडे घालायचे. मातेने दिलेले अलंकार चढवायचे आणि दासींच्या समवेत मनसोक्त हिंडायचे. वनविहारात दिवस न् दिवस खर्ची घालायचा. कधी दासींबरोबर लपंडाव खेळ, कधी नदीत पोहायला जा, नौकाविहार

कर, पशुपक्ष्यांशी मित्रत्वाच्या नात्याने वाग; त्यामुळे सगळेच तिला जवळचे वाटायचे. जेव्हा जेव्हा ती एकटी असायची तेव्हा तेव्हा झाडांशी हितगूज करे. मयूर पक्ष्याशी हितगूज कर, पांढऱ्याशुभ्र सशांना कुरवाळ यातच तिचा सगळा वेळ निघून जायचा.

तिला आठवलं, ती त्यावेळी आठ-दहा वर्षांची असेल. त्यावेळी कुण्या पारध्याने एका मयुराला बाण मारला. तो निसटून लागून गेला. मात्र मयूर जखमी झाला. त्याची ती केविलवाणी अवस्था पाहून ती कितीतरी वेळ रडत होती. दासी तिचे अश्रू पुसण्याचे काम करीत होत्या. पण जसजशा त्या तिचं सांत्वन करण्याचा प्रयत्न करायच्या तसतसं तिला अधिकच रडू यायचं.

अखेर तिने त्या जखमी मयुराला दासीकरवी महालात नेले. पिताश्रींना त्याची अवस्था दाखविली आणि म्हणाली, ''तात, ज्याने कुणी या मयुराला बाण मारला आहे त्याला ताबडतोब शोधून काढा. एका निष्पाप प्राण्याला इजा करणारा, मग तो कुणीही का असेना दोषी आहे. त्याला अपराधाची शिक्षा व्हायलाच हवी.''

तात म्हणाले, 'पृथा' होय तिचं नाव पृथा.

तर ते पुढे म्हणाले, ''पृथा, तुझं बरोबर आहे. ज्याने कुणी बाण मारला तो खरंच अपराधी आहे. पण तो नेमका कोण, हे कसं शोधून काढायचं?''

''तात, आपल्याकडे एवढं मोठं तर सैन्य आहे. त्यांना आज्ञा केलीत तर अपराधी लगेचच सापडेल.''

''ठीक आहे. आम्ही आपल्या इच्छेप्रमाणे करतो.''

आणि खरंच ताताश्रींनी काही सैनिकांना त्या अपराध्यास शोधण्यास पाठविले. शिवाय राजवैद्यांना बोलावून त्या जखमी मयुरावर उपचारही केले.

काही दिवसांनी तो मयूर बरा झाला. नेहमीसारखा हिंडूफिरू लागला. मात्र शेवटपर्यंत तो अपराधी मात्र सापडला नाही.

निसर्गसान्निध्यात वावरूनच की काय, तिचा स्वभाव अगदी हळवा बनला होता. एखाद्या दासीच्या पायात जरी काटा रुतला तरी तिच्या डोळ्यांत टचकन पाणी उभं राहायचं. दासी जितकी विव्हल होईल, तिच्याहीपेक्षा ती विव्हल व्हायची.

तिला कुणी फुलाला स्पर्श केलेला आवडत नसे. कारण ती नेहमीच उपवनात वावरत असल्याकारणाने फुलं किती नाजूक आहेत, याची तिला जाणीव असायची. अशा नाजूक पुष्पाला स्पर्श करणं म्हणजे त्याला दुखवण्यासारखं आहे असं तिला वाटायचं. म्हणूनच ती कुणालाही पुष्पाला स्पर्श करू द्यायची नाही. उपवनातल्या



हिरवळीवरून चालतानादेखील कधीकधी तिच्या मनात विचार यायचा, ही हिरवळही तेवढीच नाजूक. तिच्यावर पाऊल ठेवल्याने तिला दुखापत व्हायची नाही का? पण उपवनात विहार करायचा तर खालच्या हिरवळीवर पाऊल टाकायला पाहिजे, हे तिला जाणवायचं आणि म्हणूनच ती हिरवळीवरून चालतानादेखील अलगद पाऊल टाकायची.

तिला आणखीन एक छंद होता. रथावर आरूढ होऊन शहराचा फेरफटका मारायचा. तिची ही आवड ध्यानात घेऊन तातश्रींनी तिच्यासाठी एक छानसा रथ बनवून घेतला होता. त्याच्यावर एक कुशल सारथी नेमला होता. पण रथातून फेरफटका मारायला निघताना ती तिच्याबरोबर एक-दोन दासी आणि एक- दोन सामंत सख्या घेतल्याशिवाय बाहेरच पडायची नाही. ती बाहेर पडली की, शहरातले स्त्री-पुरुष तिला पाहण्यासाठी रस्त्याच्या दुतर्फा गर्दी करायचे. तिला पाहताच आपलं मस्तक नमवून तिला नमस्कार करायचे आणि ती हात उंचावून त्यांच्या नमस्काराचा स्वीकार केल्याचे दर्शवायची. तिला पाहण्यात लोकांना काय आनंद व्हायचा, हे तिला कधीच कळले नाही.

खरंतर इतर मुलींच्यासारखीच ती तशी देखणी होती. मध्यम बांधा, बांध्याला साजेशी उंची, किंचित उभट चेहरा, गौरवर्ण, काळेभोर मोठे डोळे, लांबसडक पापण्या, गालावर मूळचाच गुलाबी वर्ण आणि विपुल केशसंभार. ती जशी मोठी होत गेली तशी आपण इतरांपेक्षा अधिक देखण्या आहोत याचा गर्व मात्र तिला कधीही झाला नव्हता.

कित्येक वेळा तिचा महाल तिला कैदखान्यासारखा वाटायचा. कारण ती राजकन्या असल्याकारणाने तिच्यावर काही बंधनेही असायची. तिने एकटीने कधी बाहेर जायचे नाही, बाहेर जाताना दासींना बरोबरच घेऊन जायचे, तात किंवा मातेच्या आज्ञेशिवाय कुठेही जायचे नाही, अशी अनेक बंधने.

पण तिला वाटायचं इतर सर्वसामान्य मुली जशा बाहेर विहार करतात, एकटीने हिंडतात-फिरतात, कुणाच्यातही मिसळतात अगदी त्याप्रमाणे वागावे. गोरगरीब मुलींची दुःख जाणून घ्यावीत. पण तिला ही संधी कधी मिळत नसे. त्यामुळे कधी कधी ती उदास होई आणि ती उदास झालेली पाहताच माता तिच्याजवळ येई. अगदी मृदू आवाजात हाक मारे, ''पृथाऽऽ''

''काय माते?''

''आज तू अशी उदास का?''

ती काहीच उत्तर देत नसे.

पण तिचं हे मौन मातेला रुचत नसे. ती म्हणे, ''अगं! तू कारण सांगितले नाहीस तर आम्हाला तुझं दु:ख कसं कळणार?''

''माते, आमचा तुमच्यावर राग आहे.''

''अगं! पण कशाबद्दल?''

''तुम्ही आम्हाला जनतेत मिसळू देत नाही म्हणून. माते, तुम्हाला कल्पना नसेल, पण जनतेत कितीतरी मुली दु:खी आहेत. कित्येकींच्या अंगावर धड वस्त्र नाही. त्यांचे सुकलेले चेहरे पाहिले की, त्यांना काही खायला मिळतं की नाही असं वाटून ऊर भरून येतो. वाटतं त्या सगळ्याजणींना वाड्यात घेऊन यावं. त्यांना यथेच्छ खायला द्यावं, वस्त्रं द्यावीत आणि अश्रू पुसावेत.''

''पृथा, हे एकच दिवस करू शकशील तू! पण रोज हे करू पाहशील तर ते मात्र अशक्य आहे.''

''का अशक्य आहे माते?''

''कारण सगळ्यांसाठी आपण काही करत बसलो तर आपला खजिना रिकामा पडेल. सैन्याचे पगार भागवता येणार नाहीत. आपल्यालाही अन्न मिळणार नाही. पृथा, एक लक्षात ठेव, तू ज्या दरिद्री मुलींना पाहिलंस त्यांची जबाबदारी त्यांच्या माता-पित्यावर आहे. त्यांनी जर कष्ट करण्याचे टाळले, तर मुलांना अन्न-वस्त्र कसे मिळणार? आपल्या राज्यात जो कष्ट करतो त्याला कधीही कोणत्याही गोष्टीची अडचण भासत नाही.''

''पण माता-पिता कष्ट करीत नाहीत म्हणून मुलांनी उपाशी राहायचं, हे कितपत योग्य आहे?''

''याचा विचार त्यांच्या माता-पित्यांनी करावा. त्यांना काम नसेल तर त्यांनी आमच्याकडे काम मागावं. आपल्या राज्यात कामाला तोटा नाही. तुझे तातश्री इतके दयाळू आहेत की समोर आलेल्या कुणालाही काम द्यायला मागे-पुढे पाहात नाहीत. तू हे विचार डोक्यातून काढून टाक. आज ना उद्या तुझाही विवाह होईल. तूही कुठल्यातरी राज्याची राणी बनशील आणि तिथल्याही राज्यात प्रजेची तुला हीच अवस्था पाहावी लागेल. म्हणून का तू तिथं उदास बनून राहणार आहेस?''



मातेचं बोलणं तिला पूर्णत: कळलं नाही. पण तिने काही वावगं सांगितलं असं मात्र तिला मुळीच वाटलं नाही.

तिला कळायला लागल्यापासून मातेने तिला रामायणातल्या अनेक कथा सांगितल्या होत्या आणि या कथा सांगत असताना ती तिला म्हणाली होती, ''प्रभू रामचंद्रांनी स्वत: अनेक अन्याय सहन केले. कोणताही अपराध नसताना चौदा वर्षांचा वनवास पत्करला. ज्या वयात राज्य करायचं, महालात राहायचं, चांगलंचुंगलं खायचं, उंची वस्त्रं आणि अलंकार ल्यायचे त्यावेळी दंडकारण्यातल्या कंदमुळावर त्यांना आपल्या चरितार्थ चालवावा लागला. त्यांच्याबरोबर त्यांची पत्नी जानकी आणि बंधू लक्ष्मणानेही हेच भोगलं. पण नंतर मात्र राज्यावर आल्यानंतर त्यांनी आपल्या प्रजेला यत्किंचितही दु:ख दिलं नाही. ते नेहमी प्रजेच्या कल्याणासाठी झटत असत. क्षुल्लक परिटाने केलेल्या दोषारोपामुळे त्यांना आपल्या पत्नीचाही त्याग करावा लागला. नाहीतरी राजाचं हे कर्तव्यच असतं, प्रजा सुखी तर राजा सुखी, ही खूणगाठ मनाशी बांधून त्यांनी आयुष्यभर राज्य केले.''

त्यांचा हा आदर्श प्रत्येक राजाने डोळ्यासमोर ठेवून राज्य केलं असतं तर कुठल्याही राज्यातील प्रजा कधी दु:खी दिसली नसती आणि म्हणूनच तिला नेहमी वाटायचं तातांनीही असंच वागावं. प्रजा नाहीतरी राजाला आपल्या मुलासारखीच असते. मग प्रजेला काय हवं नको ते पाहणं, त्यांचे अश्रू पुसणं हे राजाचं कर्तव्यच नाही का?

एक दिवस न राहवून ती तातांना म्हणाली, ''तात, शक्यतो तुम्ही प्रजेकडे लक्ष देतच असता. असं असूनही आपल्या राज्यातील काही प्रजा दु:खी दिसते. त्यातले काही लोक अन्न-वस्त्रालाही महाग असतात. हे असं का?''

यावर तात हसले. म्हणाले, ''पृथा, तुझा प्रश्न योग्य आहे. राज्यातल्या प्रत्येकाच्या डोळ्यात अश्रू दिसता कामा नयेत, यासाठी आम्ही सतत प्रयत्न करीत असतो. आमच्या हातात केवळ एवढंच आहे. कुणाचं नशीब बदलणं आमच्या कुवतीबाहेर आहे. तू कदाचित पाहिलं नसशील, पण समाजात अशी काही माणसे आहेत की, त्यांना काम नको असतं. कुठल्याही प्रकारचे कष्ट न करता आम्ही त्यांना काही देणं म्हणजे त्यांच्या आळशी वृत्तीला खतपाणी घालण्यासारखं आहे. आम्हाला आमची प्रजा दक्ष आणि कष्टाबद्दल प्रेम बाळगणारी असायला हवी. त्याशिवाय आम्हाला हे राज्य चालवताच येणार नाही. पृथा, तू नेहमी निसर्गात वावरतेस. तू

पाहिलंच असशील – उपवनात वावरणारे पशू-पक्षीही अन्नासाठी स्वत:च प्रयत्न करीत असतात. मग माणसांनी ते का करू नयेत? रात्रीच्या अंधारात झाडाझुडपात आसरा घेऊन राहणारे पक्षी सकाळ होताच आपली घरटी सोडतात. आपलं पोट तर भरतातच पण घरट्यात असणाऱ्या आपल्या पिलांनाही आपल्या चोचीने अन्न भरवतात. मग हा आदर्श लोकांनी का घेऊ नये ?''

तिला तातांचं बोलणं पटलं. प्रत्येकाने काही ना काहीतरी कष्ट करायलाच हवेत, याची जाणीव झाली आणि विनाश्रम जगू पाहणाऱ्या लोकांचा तिला तिरस्कार वाटू लागला.

अगदी आठ-दहा वर्षांपासूनच तिला बरंच काही कळू लागलं. त्यातच गुरुजींनी तिला तसेच चांगले संस्कार दिले. गुरुजी तर नेहमी तिला सांगत. ''पृथा, स्त्री आणि पुरुष यांच्यात तसा काहीच फरक नाही. संस्कारांच्या बाबतीत म्हणशील, तर दोघांनाही सारख्याच संस्कारांनी बांधलेलं आहे आणि म्हणूनच जीवनात यशस्वी व्हायचं असेल तर प्रथम प्रत्येकाने आपलं चारित्र्य निष्कलंक ठेवायला हवं. सत्ता आहे म्हणून दीन-दुबळ्यांवर अत्याचार करणं, एखाद्याला हीन लेखणं, माणसाचंच काय पण पशू-पक्ष्यांचंही मन दुखावणं पाप आहे. परमेश्वराने आपल्याला जे शरीर दिलेलं आहे, केवळ त्याच शरीराकडे पाहात राहणं किंवा त्याला पोसणं वावगं आहे. उलट महत्प्रयासाने प्राप्त झालेलं हे शरीर, त्याचा इतरांसाठी उपयोग करणं यातच आपल्या जीवनाची सार्थकता आहे. तू पाहतेस सूर्य स्वत: जळतो पण इतरांचं जीवन प्रकाशित करतो. आपल्याला कुस्करणाऱ्या हातालाही फूल आपला सुगंध बहाल करतं. एखाद्या उंच अशा कड्यावरून कोसळणारी नदी स्वत:च्या सुखदु:खाचा विचार न करता इतरांना आपल्यातलं जीवन देऊन तृप्त करते. मग हा आदर्श स्वत:ला बुद्धिमंत समजणाऱ्या माणसाने का घेऊ नये? त्यांच्यासारखे आपण का वागू नये? पण सत्ता आणि संपत्तीच्या जोरावर माणूस नेमकं हेच विसरतो आणि त्याचे परिणाम त्याला भोगावेच लागतात. रामायणातल्या रावणाचं उदाहरण घे. काय कमी होतं त्याला? सोन्याच्या लंकेचा राजा होता तो. ते त्याने दीनदुबळ्यांच्यात वाटलं असतं तर तो परमेश्वरापेक्षाही श्रेष्ठ बनला असता. पण सुवर्णाच्या धुंदीने त्यांच्यातला माणूस संपवला. सैतान जागृत झाला आणि बळाच्या जोरावर त्याने अत्याचार करायला सुरुवात केली. अनैतिक मार्ग पत्करला. स्वत:च स्वत:च्या हाताने आपलं राज्य



तर गमावलंच, पण अगतिक मृत्यू पत्करून रौरवात गेला तो. ही उदाहरणं माणसाने विसरून जायला हवीत आणि निसर्गाने आपल्यासमोर एवढा आदर्श ठेवलेला असताना त्याचं अनुकरण करण्याचा प्रयत्न केल्यास माणसाला कोणत्याही प्रकारची उणीव भासणार नाही. पृथा, माणसाने केवळ शरीराचा असा उपयोग करावा, या मताचा मी नाही. परमेश्वराने शरीराबरोबरच माणसाला एक मन दिलेलं आहे आणि या मनाच्या इच्छेबरोबरच शरीराच्या हालचाली होत असतात. जेव्हा मन गंगाजलासारखं पवित्र असेल त्यावेळी माणसाचं शरीर वावगं वागेल असं कदापि होणार नाही. मुळातच मन हळवं, प्रेमळ, निरागस आणि निष्पाप असतं. अगदी एखाद्या लहान मुलासारखं. त्याला तसंच राहू द्यावं आणि आपण वर्तन करावं. पृथा, युद्धं होतात. ही युद्धं केवळ आपलं राज्य राखण्यासाठी असतात. युद्धभूमीवर पराक्रमी पुरुष हातात शस्त्र घेऊन शत्रूचा संहार करण्यासाठी प्रयत्नशील असतात. युद्धभूमी ही संहारासाठी असते; पण यामागे खलप्रवृत्ती नष्ट करण्याचाच प्रयत्न केला जातो आणि तोही आपल्या प्रजेच्या कल्याणासाठी. हा संसार पाप समजून चालणार नाही तर, ते एक कर्तव्य आहे अशाच हेतूनं रणभूमीवर वागायला हवं. प्रजेच्या कल्याणासाठी स्वत:ला संकटात लोटणं म्हणजे आपलं मन, शरीर सार्थकी लावण्यासारखंच आहे. हा प्रसंग माझ्यासमोर ठेऊन तू मला याबद्दल विचारशील. एवढ्यासाठी मी याचं स्पष्टीकरण केलं.''

गुरुजी प्रत्येक वेळेला तिच्यासमोर अशीच काही उदाहरणं मांडत आणि ती त्यांच्या या वक्तव्याने भारावून जाई.

कदाचित यामुळे तिचा स्वभाव इतरांपेक्षा काहीतरी वेगळा बनला होता.

ती स्वत: राजकन्या. अमात्यांपासून सगळ्यांच्यावर तसं तिचं वर्चस्व होतं. परंतु तरीसुद्धा कुणावर वचक ठेवणं तिला कधीच जमलं नाही. एखाद्या द्वारपालावरसुद्धा तिने कधी राग केला नाही. प्रत्येकावर प्रेम केलं आणि त्याचाच परिणाम की काय सगळ्यांनीच तिला आपलं मानलं आणि त्यामुळे गुरुजींच्या वचनाचा तिला प्रत्यय आला होता.

गुरुजी तिला म्हणायचे, ''पृथा, माणसाला काही प्राप्त करायचं असेल तर प्रथम आपण द्यायला शिकले पाहिजे. तुला ठाऊक आहे. काटे पेरणाऱ्याने आम्रफलाची कधीच अपेक्षा करायची नसते. म्हणूनच चांगल्या गोष्टीची अपेक्षा असेल तर सुरुवातीला आपणच चांगलं काहीतरी द्यायला हवं.''

तिनेही प्रत्येकाला प्रेम दिलं तेही दोन्ही हातांनी आणि त्याचा परिणाम म्हणून की काय पण हजारो हात तिला प्रेम द्यायला तयार झाले.

हा आणि अशाच प्रकारचा विचार करीत तिने महालात प्रवेश केला आणि प्रथम ती मातेच्या महालात गेली. हा तिचा परिपाठच होता. उपवनातून परतल्या परतल्या मातेच्या महालात प्रवेश करायचा आणि पूजेत मग्न असलेल्या मातेशेजारी बसून मातेला पूजेत मदत करायची. उपवनातून परतत असताना ती पूजेसाठी फुलं घेऊन यायची आणि माता तीच फुलं देवाला वाहायची.

पूजा आटोपल्यानंतर तिचा काही वेळ मातेशी गप्पा मारण्यात जायचा. मातेच्या बोलण्यातूनही तिला अनेक संस्कारक्षम गोष्टी कळायच्या.

त्या दिवशी गप्पा मारता मारता माता तिला म्हणाली, ''पृथा, तुला समजलं?''

''कशाबद्दल बोलते आहेस माते?''

''तुझ्या काकामहाराजांच्याबाबत!''

''काय झालं काकामहाराजांना?''

''झालं काहीच नाही.''

''मग?''

''काका महाराज येताहेत. त्यांच्याकडून आज सकाळीच एक दूत आला.''

''काही निरोप आणला आहे का त्यांनी?''

''ते तुला तुझे तात सांगतील.''

राजा कुंतीभोज म्हणजे तिच्या तातांचे आप्तच. अधूनमधून ते त्यांच्याकडे यायचे. काही दिवस मुक्कामाला राहायचे. अगदी त्याप्रमाणे तीही काही दिवस त्यांच्याकडे जायची आणि ती गेली किंवा काकामहाराज आले की चार दोन दिवस ते सगळे मिळून मृगयेला जायचे.

दहा-बारा वर्षांचं वय असेल तिचं त्यावेळी. अगदी प्रथमत: तिने तातांच्याकडे मृगयेला येण्यासाठी हट्ट केला. त्यावेळी तात म्हणाले, ''पृथा, हा हट्ट सोडून दे.''

''पण का?''

''कारण तू अजून लहान आहेस.''

''म्हणून काय झालं? लहानांनी मृगयेला जाऊ नये असा नियम आहे का?''

''पृथा, मृगयेला जाणं तेवढं सोपं नाही. कारण मृगयेच्या निमित्ताने सगळं जंगल पालथं घालावं लागतं. अमाप दौड करावी लागते. कित्येक वेळा हिंस्त्र



श्वापदांच्या रूपाने मृत्यू आपल्यासमोर उभा राहतो. त्यांच्याशी दोन हात करताना काहींना आपले प्राण गमवावे लागतात. एकमेकांकडे लक्ष द्यायलासुद्धा अवसर मिळत नाही. अशावेळी तू जर मृगयेला आलीस, तर तुझ्याकडे लक्ष कोणी द्यायचं?''

यावर तिला काय उत्तर द्यावे हेच सुचले नाही. पण तिच्या मदतीला काकामहाराज आले. ते म्हणाले, ''शूरा, तिच्याकडे मी लक्ष देईन. पण तिची मृगयेला येण्याची इच्छा मोडू नकोस.''

''कुंतीभोज, तू शुद्धीत आहेस का? या एवढ्या लहान पोरीला बरोबर घेऊन जाणं किती धोक्याचं आहे याची तुला चांगलीच कल्पना आहे.''

''अरे, म्हणून तर आम्ही तिला आमच्याबरोबर नेणार आहोत. पृथा लहान असली म्हणून काय झालं? तिनेही मृगया पाहायला हवी. तू काळजी करू नकोस. पृथा माझ्या रथात असेल. तिला सकुशल परत आणण्याचं काम माझं.''

आणि काका महाराजांच्यामुळे ती अगदी पहिल्यांदाच मृगयेला गेली होती.

आणि तेच काकामहाराज – राजा कुंतीभोज त्यांच्याकडे येणार होते. ते त्यांच्याकडे येणार या कल्पनेनेच तिला केवढा तरी आनंद झाला.

✦✦✦

# दोन

महाराज कुंतीभोज हे तिच्या तातांचे आतेभाऊ. पण भावापेक्षा ते अत्यंत चांगला स्नेही, मित्र समजूनच ते एकमेकांशी प्रेमाने वागत होते. जवळीकीने एकमेकांची विचारपूस करीत होते. एकमेकांना गळामिठी घालत होते. महाराज कुंतीभोजांच्या स्वागतासाठी स्वत: महाराज शूर आपल्या लवाजम्यासह जातीने सीमेवर पोहोचत. कुंतीभोज आल्याचे पाहताच दोघे मित्र सारे भान विसरून एकमेकांकडे धावत जात. एकमेकांच्या आलिंगनात शिरत असतानाच महाराज शूर म्हणत, ''कुंतीभोजा, किती दुबळा झाला आहेस रे तू? खायला वगैरे मिळते की नाही तुझ्या राज्यात?''

''आणि तू स्वत: मल्ल झाल्याचं समजतोस की काय?''

यावर दोघेही खदखदून हसत आणि मग एकाच रथावर आरूढ होऊन नगरात प्रवेश करीत.

त्यांचे हे परस्परांवरचे प्रेम सगळ्या प्रजेचा कौतुकाचा विषय ठरला होता. लोक म्हणत, ''मैत्री असावी तर महाराज शूर-महाराज कुंतीभोजासारखी.''

काका तातांच्याच रथातून महालासमोर पायउतार झाले आणि ती त्यांच्या स्वागतासाठी पुढे झाली. त्यांच्या पदकमलांना स्पर्श करून त्यांना नमस्कार केला. त्यांनी तिला आपल्या बाहूत जखडले नि म्हणाले, ''पृथा, कुशल आहेस ना?''

''जी काकामहाराज!''

''हयातभर अशीच कुशलमंगल राहा.''

त्यांनी तिला आशीर्वाद दिला.

आणि मग त्या सगळ्यांनीच महालात प्रवेश केला.

तिचा तो दिवस काकांच्या आदरसत्कारात गेला.



त्यानंतरचे दोन दिवस मृगयेतच गेले. ती स्वत: काकांच्या समवेतच होती. काका आले की दिवस कसे जात हे कळतच नसे. त्यांच्याबरोबर सारीपाट खेळणे, वनविहार करणे यात दिवस कधी उगवला आणि मावळला केव्हा हेही कळत नसे आणि म्हणूनच यावेळचे पाच दिवस केव्हा सरले याची जाणीवही झाली नाही तिला.

सहाव्या दिवशी तातांच्याकडून तिला निरोप आला. तीही तत्काळ तातांच्या महालात गेली. महालात माताही होती. तिला पाहताच तातांनी तिला आपल्याजवळ बसवून घेतले. तीही बसली.

तातांनी हाक मारली, ''पृथाऽऽ''

''जी तात.''

''आज तुला एक महत्त्वाची गोष्ट सांगायची आहे. खरं तर ही गोष्ट आम्ही याआधीच तुला सांगायला हवी होती. पण योग्य वेळी सांगता येईल असा विचार करून आम्ही ती टाळली आणि आत ती योग्य वेळ आली आहे.

फार जुनी गोष्ट आहे पृथा. त्यावेळी तुझा जन्मही झालेला नव्हता. राजा कुंतीभोज आमचा जसा स्नेही आहे, तसाच तो आतेभाऊ आहे. त्याला मूलबाळ नसल्याकारणाने तो आणि त्याची पत्नी, दोघेही सतत दु:खी असत. अर्थात, ते का दु:खी असत त्याचं कारण आम्हाला ठाऊक नव्हतं. पण आजच्यासारखाच तो असाच आमच्याकडे आला असताना आम्ही त्याला त्याच्या दु:खाचं कारण विचारलं. आतेभाऊ या नात्यापेक्षा तो आमचा एक चांगला मित्र आहे आणि मित्र कधी दु:खात असू नये असं आम्हाला वाटत होतं. म्हणूनच आम्ही त्याचं दु:ख जाणून घेण्याचा प्रयत्न केला आणि त्यावेळी त्यानं आमच्याकडे आपलं मन मोकळं केलं.''

''कसलं दु:ख होतं तात, काकामहाराजांना?''

''आपण अपत्यहीन असल्याचं.''

''मग? आपण काय केलंत?''

''आम्ही त्याला एक वचन दिलं.''

''कोणतं?''

''आम्हाला जे पहिलं अपत्य होईल ते आम्ही त्याला देण्याचं.''

ती चमकलीच. मनोमन घाबरलीही. कारण तातांचं पहिलं अपत्य तीच होती. म्हणूनच काहीशा घाबरलेल्या स्वरात तिने विचारले, ''तात, आपण मला काकांना देणार आहात?''